महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०१९

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

मद्याच्या बाटलीवर इंटॅग्लिओ होलोमॅम प्रिंटीग करणेबाबत

(१) २१३३ (२२-०१-२०१५) श्री.बंटी भांगडिया (चिमूर), डॉ.देवराव होळी (गडचिरोली), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मद्याच्या बाटलीवर इंटॅग्लिओ प्रिंटींग बाबत दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ पर्यंत वा त्यादरम्यान मा.उत्पादन शुल्क मंत्री महोदयांनी कंत्राटीची सर्व प्रक्रिया पुर्ण करु असे आश्वासित केलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटाची कोणतीही प्रक्रीया अद्याप पुर्ण झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंत्राटाची प्रक्रिया पुर्ण न केल्यामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडविण्यास जबाबदार असलेल्या दोषी अधिका-यांवर कारवाई कोणती कारवाई करण्यात येणार आहे वा येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०४-०१-२०१५) :(१) होय,

(२) होय,

(३) व (४) इतर राज्याची माहिती घेतली असता मद्याच्या बाटल्यांवर होलोग्राम लावल्यामुळे महसूलात वाढ झाल्याचे निर्देशनास आलेले नाही. तसेच राज्यात राबविण्यात येणाऱ्या विचाराधिन योजनामुळे महसूलात वाढ होईल हे निश्चितपणे सांगता येत नाही. तथापि, या योजनेमुळे अवैध मद्याला व तस्करीला आळा घालता येणे शक्य होईल. यास्तव ही योजना सविस्तर अभ्यासाअंती राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव आश्रमशाळेचे पिंपरी दिक्षित (ता.मूल,जि.चंद्रपूर) आश्रमशाळेमध्ये समायोजन केल्याबाबत

(२) ५४५५ (२५-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातंर्गत सिंदेवाही तालुक्यातील मरेगाव आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची प्रवेशित संख्या कमी असल्याचे कारण दाखवून शासनाने क्र शाआशा-२०१३ /प्र.कक्र.३१४ /१३ दिनांक १०/७/२०१४ या आदेशाअन्वये मरेगाव आश्रमशाळेतील सर्व वर्ग शासकीय आश्रमशाळा पिंपरी दिक्षित (ता.मूल, जि.चंद्रपूर) येथे समायोजन केल्यामुळे मरेगावची आश्रमशाळा बंद करण्यात आली होती. त्यामुळे आदिवासी समाजातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, त्यामुळे नागरीकांनी सदर शासकीय आश्रमशाळा पुन्हा सुरु करावे अशी मागणी आदिवासी विभागाकडे केली होती व त्याअनुषंगाने प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विभाग, चंद्रपूर यांनी दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी मरेगाव येथील शासकीय आश्रमशाळेचे समायोजन रद्द करुन येत्या मार्च २०१५ मध्ये सदर आश्रमशाळा सुरु करण्यासाठीचा प्रस्ताव अप्पर आयुक्त, आदिवासी विभाग, नागपूर यांच्याकडे पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास , सदर प्रस्ताव अंतिम मंजूरी करीता शासनाकडे पाठविलेला असतांना सुध्दा सदर प्रस्तावास अद्यापही मंजुरी मिळालेली नसल्यामुळे लोकप्रतिनिधी यांनी मा. आदिवासी विकास मंत्री, प्रधान सचिव, आदिवासी विकास, आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांना दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिले आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त आदिवासी विकास विभाग नाशिक यांच्या सोबत वारंवार दुरध्वनीवरुन संपर्क केला होता हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रस्तावास मंजूरी मिळण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (०७-०१-२०१९) : (१) अंशत: खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा, मरेगांव,जि.चंद्रपूर येथे प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे १ ली ते ७ वी च्या वर्गाचे समायोजन शासकीय आश्रमशाळा, पिंपरी

दिक्षीत,जि.चंद्रपूर येथे करण्यात आले आहे. परंतु शाळेतील एकून ६९ विद्यार्थ्यांना त्यांच्या पालकांच्या संमतीने शाळा सोडल्याचा दाखला दिला असुन विद्यार्थ्यांनी जवळच्या जिल्हा परिषद शाळेत व अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतला असुन विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिलेले नाहीत.

मरेगांव आश्रमशाळा पूर्ववत सुरू करण्याबाबत ग्रामपंचायत, मरेगांव यांना विनंती केली असुन त्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

(५) शासन निर्णय दि.५.८.२०१६ अन्वये शासकीय आश्रमशाळा, पिंपरीदिक्षीत,ता.मुल व उमरी पोतदार ,ता.पौंभुर्णी या शाळा मरेगांव आश्रमशाळेच्या इमारतीत स्थलांतरित करण्यात आल्या आहेत.सद्यस्थितीत या इमारतीत १४१ विद्यार्थ्यी शिक्षण घेत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

पवन ऊर्जा प्रकल्पातील गैरव्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल

(३) ४५९४८ (२०-०४-२०६०) श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवन ऊर्जा प्रकल्पातील गैरव्यवहाराची नेमण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल माहे मे,२०१५ च्या सुमारास शासनास सादर केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालात महसूल अधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करुन पवन ऊर्जा प्रकल्प शासनाने ताब्यात घ्यावेत अशी शिफारस करण्यात आली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अहवाल आणखी कोणकोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत व त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(४) असल्यास, या अहवालातील शिफारशीनुसार दोषी महसूल अधिका-यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(५) अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१९) : (१) पवनऊर्जा प्रकल्पांसाठी घेतलेल्या जमीन व्यवहाराबाबत तत्कालीन अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने शासनास सादर केलेला अहवाल व या विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा पूर्तता अहवाल, माहे एप्रिल, २०१५ मध्ये विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदरहू समितीने एकूण १२ शिफारशी केलेल्या आहेत. सदरहू शिफारशींच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही संबंधीत विभागांनी करण्याचे सूचित करण्यात आले आहे. तसेच या विभागाच्या दि.२१.१०.२०१३ च्या शासन निर्णयान्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली "पवनऊर्जा प्रकल्प जिल्हास्तरीय संनियंत्रण समिती" स्थापन करण्यात आली आहे.

(४) महसूल व वन विभागाकडून या संदर्भात पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

अखिल भारतीय कोळी समाजाच्या वतीने कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेले आंदोलन

(४) ५७०५१ (१४-०९-२०१६). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अखिल भारतीय कोळी समाजाच्या वतीने माहे जानेवारी, २०१६ मध्ये कोल्हापूर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंदोलनकर्त्यांच्या मागण्या कोणकोणत्या आहेत,

(३) त्यापैकीं कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत व उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१५-०२-२०१९) : (१), (२), (३) व (४) होय, अखिल भारतीय कोळी समाजाच्या निवेदनाद्वारे खालील प्रमाणे मागण्या करण्यात आलेल्या होत्या:-

१. गाव कामगार तलाटी यांनी कोळी महादेव जातीचे दाखले द्यावेत.

२. तहसिलदार व उप विभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनुसूचित जमातीचा दाखला मागणीसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी फलक लावावेत.

३. अनु. जमाती दाखला सक्षम अधिकारी यांचे कार्यालयात स्विकारावेत व त्यांनी त्यांच्या ज्ञान आकलनानुसार विना विलंब निर्गमित करावी.

४. प्रांताधिकारी यांनी अशा अर्जावर विहीत मुदतीत कार्यवाही करावी.

५. राज्यातील सर्व पडताळणी समित्या बरखास्त करुन पडताळणीचे अधिकार अप्पर जिल्हाधिकारी यांना देण्यात यावेत तसेच अपिलाचे अधिकार विभागीय आयुक्त यांना द्यावेत.

शासनाने जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन अधिनियम २००० लागू केला त्याअंतर्गत प्रमाणपत्र देण्याचे नियम २००३ तयार केलेले आहेत. त्यानुसार दिनांक ४ जून २००३ च्या अधिसूचनेन्वये अनुसूचित जमातीचे दाखले देण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषित करण्यात आलेले आहेत. तसेच उक्त नियम २००३ च्या नियम ३(३),३(४)

नुसार कागदपत्रे सादर करणे आवश्यक असून नियम ४ मध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्याची कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. मागणी क्र. १ ते ४ संदर्भात शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्याकडून उपविभागीय कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची रचना ही मा. सर्वोच्च न्यायालयाने कुमारी माधुरी पाटील विरुध्द अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे प्रकरणी दिलेल्या न्याय निर्णयातील मार्गदर्शक तत्वानुसार करण्यात आलेली आहे.

आदिवासी वाडयांना (ता.पनवेल, जि.रायगड) पं.दीनदयाळ उपाध्याय योजनेअतंर्गत विद्युत पुरवठा करण्याबाबत

(५) ६५५३७ (२७-०१-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल तालुक्यातील (जि. रायगड) दुर्गम व डोंगरदरीत असलेल्या १० आदिवासी वाडयांना अद्यापपर्यत विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी पाडयांना पं.दीनदयाळ उपाध्याय योजने अंतर्गत विद्युत पुरवठयांचे काम करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, या १० आदिवासी वाडयांना तातडीने विद्युत पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) व (३) "दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती" योजने अंतर्गत सदर आदिवासी पाडयांच्या विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

लघुउद्योजक-मध्यम व मोठे वीज ग्राहक यांना सुरळीत वीज पुरवठा करण्याबाबत

(६) ६५६०९ (२७-०१-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषतः विकसित, विकसनशील व अविकसित अशा नागरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना विजेचा पुरेसा पुरवठा करण्याबरोबरच तेथील लघुउद्योजक- मध्यम व मोठे वीज ग्राहक यांना विनासायास वीज पुरवठा करण्याबाबतच्या योजनेंतर्गत (PPP) वीज पुरवठा करण्याबाबतची मागणी तेथील वीज ग्राहकांनी- वीज उपभोक्ता यासह स्थानिक

वीजग्राहक नागरिक, सेवाभावी संस्था, जनप्रतिनिधी तसेच आसपासच्या क्षेत्रातील रहिवाशी संघटना यांच्यावतीने मा. मंत्री (ऊर्जा), मा. राज्यमंत्री (ऊर्जा), अतिरिक्त मुख्यसचिव (ऊर्जा), महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ संचालनालय तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी आणि संबंधित इतर तत्सम अधिकाऱ्यांकडे माहे सप्टेंबर-२०१६ रोजी वा त्या सुमारास लेखीनिवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय?

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने संबंधित प्रकरणी ऊर्जा विभागाच्यावतीने तसेच जनप्रतिनिधी व जागृत नागरिकांच्या संघटनेने सदर बाब वेळोवेळी राज्य विद्युत नियामक आयोगाच्याही निदर्शनास आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मागणीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास,चौकशीअंती विकसित, विकसनशील व अविकसित अशा नागरी व ग्रामीण भागातील वीज ग्राहकांना विजेचा पुरेसा पुरवठा करण्याबरोबरच तेथील लघुउद्योजक- मध्यम व मोठे वीज ग्राहक यांना विनासायास वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१९) : (१), (२), (३) व (४) देशातील सर्वांना २४ X ७ वीज (Power for All) ही संकल्पना केंद्र शासनाने नोव्हेंबर, २०१५ मध्ये मांडली.

या योजनेअंतर्गत राज्यातील कृषी ग्राहक वगळून सुमारे १९.३६ लाख ग्राहकांना मार्च, २०१९ पर्यंत वीज पुरवठा करण्याचे धोरण निश्चित केले होते. सदर संकल्पने अंतर्गत दिनांक ७.२.२०१९ पर्यंत ३७,६२,९१७ घरकुलांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच ४६५२ मे.वॅ. औष्णिक वीज निर्मितीत वाढ करण्यात आली. उपकेंद्राची क्षमता ५६२५ मे.वॅ. ने वाढविण्यात आली. ५५८ नवीन उपकेंद्रे कार्यान्वित करण्यात आली. ६९२९ कि.मी. ३३ के.व्ही. वाहिनी उभारण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दारिद्रय रेषेखालील (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग) कुंटूंबियांना देण्यात येणाऱ्या राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेबाबत

(७) ६७२७८ (२७-०१-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील अतिदुर्गम ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील ३५० कुंटूंबियांना राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेंतर्गत मागील २ वर्षापासून वीज जोडणी देण्यास महावितरणकडून विलंब होत असल्याने आजही वीजजोडणी अभावी सदरहू कुंटूंबे अंधारातच आहेत, हे खरे आहे काय

(२) असल्यास, २०१४ मध्ये वीज जोडण्यासाठी सदरहू लाभार्थ्यांनी प्रस्ताव सादर करून अनामत रक्कम भरूनही या लाभार्थ्यांना महावितरण विभागाकडून वीज जोडणी देण्यास टाळाटाळ झाल्याने सदरहू कूंटूंबाना तसेच शाळकरी मुलांना वीजे अभावी अनेक समस्यांना

सामोरे जावे लागत असल्याने त्यांनी सातत्याने वीजवितरण कार्यालयाकडे पाठपुरावाही केलेला आहे, हेही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू लाभार्थ्यांना विनाविलंब वीज जोडण्या देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०१८) : (१) हे खरे आहे.

(२) सन २०१४ या वर्षामध्ये राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेअंतर्गत कोणत्याही दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांकडून अनामत रक्कम भरुन घेतलेली नाही.

(३) सिंधुदुर्ग जिल्हयातील राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेतील शिल्लक राहीलेल्या ८८ लाभार्थ्यांना दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजनेमध्ये वीज जोडण्या देण्यात येणार आहेत. दीनदयाळ उपाध्यायग्राम ज्योती योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयाच्या कामांकरिता कार्यादेश देण्यात आलेले असून कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प (ता. केळापूर जि. यवतमाळ) अंतर्गत असलेल्या राळेगाव व घाटंजी येथील शासकीय मुलींच्या वसतीगृहाबाबत

(८) ८०७९५ (२८-११-२०१७). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा (ता. केळापूर जि. यवतमाळ) अंतर्गत असलेल्या राळेगाव व घाटंजी येथील मुलींच्या शासकीय वसतीगृहास भोजन व भाजीपाला पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराने त्याचे देयक मिळणेसाठी स्थानिक प्रकल्प अधिकारी यांच्याकडे वारंवार लेखी निवेदन देऊन देखील देयक मिळत नसल्याने कंत्राटदारास उपोषणास बसण्याची वेळ आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक अधिकारी कंत्राटदारांना त्यांचे देयक देण्यासाठी नाहक त्रास देत असतात, हे हि निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित प्रकल्प अधिकारी व कर्मचारी यांचेवर शासनाने कारवाई केली आहे काय वा करण्यात येत आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१८) : (१) व (२) हे खरे नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पांढरकवडा अंतर्गत आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह घाटंजी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ व आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह, राळेगांव, ता. राळेगाव, जि. यवतमाळ या दोन्ही वसतीगृहांसाठी सन २०१६-१७ या वर्षाकरीता

भोजन ठेका अनुक्रमे श्री. जयपाल मेश्राम व श्रीमती शिला जयपाल मेश्राम यांना देण्यात आला. दोन्ही वसतीगृहांचे भोजन ठेकेदार यांनी भोजन पुरवठा दिनांक ५.८.२०१६ पासून विलंबाने सुरू केला.

भोजन ठेक्याची देयके प्रकल्प कार्यालयास मंजूरी करता सादर करण्यात आली असता मंजूर देयकांची विद्यार्थ्यांचे उपस्थितीनुसार तपासणी केल्यानंतर सदर देयके अचूक नसल्याने आक्षेप काढण्यात येऊन देयके परत पाठविण्यात आली. भोजन ठेकेदार यांनी बोगस देयके पारीत करुन घेण्यासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, केळापूर, जि. यवतमाळ या कार्यालयासमोर दिनांक ५.११.२०१६ पासून उपोषण सुरु केले. वसतीगृहांच्या भोजन पुरवठयाच्या देयकांच्या आक्षेपाची पूर्तता करुन संबंधित पुरवठादाराने दिनांक ३०.११.२०१६ रोजी देयके सादर केल्यानंतर सदर देयके प्रकल्प कार्यालय स्तरावर दिनांक २.१२.२०१६ रोजी मंजूर करण्यात येऊन भोजन ठेकेदारास देयके अदा करण्यात आली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विखरणी (ता.येवला जि नाशिक) अक्षय प्रकाश योजना सुरु करणेबाबत

(९) ८५४३६ (०९-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विखरणी (ता.येवला जि.नाशिक) येथील विद्युत उपकेंद्रातून अक्षय प्रकाश योजना चालू करण्याच्या मागणीसाठी येवला तालुक्यातील ग्रामस्थांनी दि. २२, मे २०१७ पासून आमरण उपोषण सुरु केले होते, हे खरे आहे काय,

(२) तसेच विखरणी विद्युत उपकेंद्रातून अक्षय प्रकाश योजना सुरु होईपर्यंत विखरणी, आडगावरेपाळ , विसापूर कानडी व कातरणी इ. ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांमध्ये वीज देयक न भरण्याबाबत ठराव करुन शासनास पाठविण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास , अधिक्षक अभियंता नाशिक ग्रामीण मंडळ मालेगाव (जि. नाशिक) यांनी अक्षय प्रकाश योजना सुरु करण्याबाबत असहकार्य केल्याने त्यांची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि २४ मे २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली , हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रश्न भाग १, २ व ३ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) वरील आशयाचा ठराव कोणत्याही ग्रामपंचायत कार्यालयाकडून शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(३) असे पत्र महावितरण कंपनीस अथवा शासनास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(४) अक्षय प्रकाश योजना ही २००८ मध्ये कार्यरत होती. त्यामुळे एखाद्या फिडरवरील गावांनी कमाल मागणीच्या वेळेला (Peak Hour) (५.०० P.M. ते १०.०० P.M.) मध्ये वीजेचा वापर २०% कमी केल्यास त्यांना त्या वेळेत भारनियमन करण्यात येत नव्हते. सदर योजना सद्यस्थितीत बंद करण्यात आलेली आहे. त्यानंतर प्रत्येक वाहिनीवरील वाणिज्य व तांत्रिक हानीनुसार भारनियमनाचे वेगवेगळे गट अनुक्रमे अ,ब,क,ड,इ,जी असे गट बनविण्यात आले व गटाप्रमाणे भारनियमन करण्यात येते. राज्यात वीजेच्या उपलब्धतेमुळे माहे फेब्रुवारी, २०१७ पासून कुठेही भारनियमन होत नाही.

३३/११ के.व्ही विखरणी उपकेंद्रातून येवला तालुक्यातील कृषी बहुल वाहिन्यांवर असलेल्या घरगुती व वाणिज्य ग्राहकांकरिता अखंडित वीज पुरवठा करता यावा याकरिता त्या वाहिनींवर दिनदयाल उपाध्याय ग्रामीण विद्युतीकरण योजना अंतर्गत SDT बसवून सिंगल फेज योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पन्हाळा तालुक्यातील (जि.कोल्हापूर) येथील विजेचे खांब धोकादायक असल्याबाबत.

(१०) ९२०७० (०९-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील २३०० गंजलेले विजेचे खांब धोकादायक बनले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धोकादायक विजेचे खांब तात्काळ बदलणे गरजेचे असून ते न बदलल्यास जीवित व वित्त हानी होण्याची शक्यात निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणच्या यु ॲण्ड एम योजनेतून पोल बदलणे सध्या बंद आहे, हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचे धोकादायक विजेचे गंजलेले खांब बदलण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१२-०२-२०१९) : (१),(२), (३) व (४) माहे सप्टेंबर, २०१७ अखेर कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील एकूण १०७ पोल गंजलेल्या अवस्थेत होते. महावितरणद्वारे त्यापैकी ८६ पोल शहरीकरण आणि आधुनिकीकरण (U&M) योजनेअंतर्गत व उर्वरित २१ पोल देखभाल व दुरुस्ती योजनेअंतर्गत बदलण्यात आले. सन २०१७-१८ मध्ये एकूण ३१३ गंजलेले पोल बदलण्यात आलेले आहेत.

भांबर्डे (ता.शिरूर,जि पुणे) येथील करण कृषी पर्यटन केंद्राला लागलेली आग

(११) ९२८९८ (१५-०८-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भांबर्डे (ता.शिरूर, जि पुणे) येथील करण कृषी पर्यटन केंद्राला दिनांक १८ एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास आग लागून २ गॅस सिलेंडरचा स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगी मध्ये पर्यटन केंद्रातील बरीचशी झाडे, तंबू, जनरेटर, फ्रिज इत्यादी वस्तु जळाल्या, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या कृषी पयटर्न केंद्राला अद्याप शासनाकडून कुठलीही नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कृषी पर्यटन केंद्राला नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०१-२०१९) : (१) हे खरे आहे. सदरची घटना दिनांक १०.०४.२०१७ रोजी घडलेली आहे.

(२) हे खरे आहे

(३) हे खरे आहे.

नुकसान भरपाई देण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न झाल्यामुळे सदर कृषी पर्यटन केंद्राच्या मालकास नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही.

(४) नुकसान भरपाई प्रस्तावामध्ये अपूर्ण असलेली आवश्यक कागदपत्रे सादर करणेबाबत कार्यकारी अभियंता, महावितरण, केडगांव यांनी संबंधितांस कळविले आहे. आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर महावितरण कंपनीच्या नियमानुसार भरपाई देणेसंबंधीची कार्यवाही त्वरीत पूर्ण करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हयातील महावितरणाच्या पायाभूत विकास आराखड्याबाबत

(१२) ९६३९५ (०१-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील महावितरणाच्या पायाभूत आराखडा टप्पा दोनच्या लोकप्रतिनिधींच्या भोसरी विभागीय कार्यालया अंतर्गत तक्रारींबाबत पायाभूत विकास आराखडा कार्यालय, पुणे यांचेमार्फत मा. सदस्य विद्युत वितरण संनियत्रण समिती यांचे समक्ष व मुख्य अभियंता (गुणवत्ता नियंत्रण) याच्या कार्यालयामार्फत पुणे परिमंडळातील इतर विभागीय कार्यालयामध्ये

पायाभूत विकास आराखडा अंतर्गत झालेल्या कामाची नमुना तपासणी सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तपासणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०२-०२-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) भोसरी विभागीय कार्यालयाअंतर्गत सदस्य विद्युत वितरण सनियंत्रण समिती यांच्याकडून सहयोगनगर या ठिकाणचे भूमिगत वाहिनीच्या कामाबाबत दि. ०८.०५.२०१७ रोजी पत्र प्राप्त झाले होते. सदर पत्रास अनुसरुन दि. १६.०५.२०१७ व १७.०५.२०१७ रोजी संबंधीत ठेकेदार प्रतिनिधी, सदस्य विद्युत वितरण सनियंत्रण समिती यांचे प्रतिनिधी व पायाभूत आराखडा कार्यालय यांचे प्रतिनिधी बरोबर, सहयोगनगर येथील कामाची संयुक्त तपासणी करण्यात आली. सदर तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटी ठेकेदारास कळविण्यात आल्या आहेत. सदर त्रुटी दूर केलेबाबत दि. ०९.०६.२०१७ रोजी संबंधित ठेकेदार प्रतिनिधी, सदस्य विद्युत वितरण सनियंत्रण समिती यांचे प्रतिनिधी व पायाभूत आराखडा कार्यालय यांचे प्रतिनिधी समक्ष खातरजमा करण्यात आली.

याबरोबरच, मुख्य अभियंता (गुणवत्ता नियंत्रण) यांचे कार्यालयामार्फत पुणे परिमंडळातील इतर विभागीय कार्यालयामध्ये पायाभूत आराखडा अंतर्गत झालेल्या कामांची नमुना तपासणी करण्यात येते. सदर तपासणीमध्ये विविध विभागात कामांमध्ये आढळलेल्या त्रूटी दुरुस्त करण्याबाबत संबंधित ठेकेदार (पायाभूत आराखडा-२ योजना) यांना कळविण्यात आल्या व त्यातील प्रमुख त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे. तसेच वेळोवेळी तपासणी करतांना आढळून आलेल्या त्रुटी विहित मुदतीत दूर न केल्यास निविदा अटी व शर्तीनुसार ठेकेदारांवर कारवाई करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

महावितरण विभागाची (ता.औसा, जि. लातूर) येथील मंजूर असलेली रोहित्र व विद्युत लाईनची कामे प्रलंबित असल्याबाबत

(१३) ९९२०१ (२९-१२-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि. लातूर) तालुक्यातील मराठवाड्यासाठी दिलेल्या निधी अंतर्गत गत वर्षी महावितरण विभागाची मंजूर असलेली रोहित्र व विद्युत लाईनची प्रलंबित कामे पूर्ण करण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनीधिनी दि.३/११/२०१७ रोजीच्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मागणी केली आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर कामे अद्यापही प्रलंबित असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत व सदर कामे तातडीने व वेळेत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात

येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-०६-२०१८) :

(१) दि. ०३.११.२०१७ रोजीच्या लातूर जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तामध्ये अशी मागणी केल्याचे आढळून येत नाही.

(२) विदर्भ-मराठवाडा विशेष कृषीपंप योजनेअंतर्गत सन २०१७ मध्ये १७३२ कृषीपंपाना आवश्यक पायाभूत सुविधा उभारुन वीज पुरवठा देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

यंत्रमाग उद्योगात अडचणी निर्माण झाल्याबाबत

(१४) १००५१६ (१३-०७-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्याआर्थिक पाहणी अहवालानुसार राज्यात सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षामध्ये राज्यात १० लाख यंत्रमाग कार्यान्वित असून त्यात १९ लाख कामगार काम करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी, मालेगाव, इचलकरंजी व सोलापूर या ४ महत्वाच्या शहरामधील यंत्रमाग उद्योगाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला असता तेथील हजारो कामगार बेरोजगार झाले असल्याचेही दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या पाहणी अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पाहणी अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. सुभाष देशमुख (०५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१६-१७ मध्ये प्रकाशित केल्यानुसार राज्यात १० लाख यंत्रमाग कार्यान्वित असुन त्यात १९ लाख कामगार काम करीत आहेत

(२) दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजीचा पाहणी अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही. तसेच शासनाकडुनही अशी कोणतीही पाहणी करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

खोपटे कचरेपाडा (ता.उरण, जि.रायगड) येथील न्यू ट्रान्स इंडिया कंपनीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान

(१५) १००९०६ (०३-०१-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) खोपटे कचरेपाडा येथील न्यू ट्रान्स इंडिया कंपनीने सन २०११ पासून शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान केले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नुकसानीचा तहसिलदार, तलाठी मंडळ अधिकार यांचेमार्फत तीन वेळा पंचनामा झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१०-०१-२०१९) :(१), (२), (३) व (४)

मौ.खोपटा येथील स.नं.१८/६ क्षेत्र ०.१९, स.नं.२३/७ क्षेत्र ०.११.७ व स.नं.१८/७ क्षेत्र ०.०८.९ पो.ख.०.००.२ या जमीनी न्यु ट्रान्स इंडिया कंपनीच्या दुषित पाण्यामुळे नापीक होत असल्याची तक्रार तहसिलदार, उरण यांच्याकडे केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा मृदा चाचणी अधिकारी यांनी केलेल्या पाहणी अहवालानुसार सदरची जमीन नारळ, पेरू, सुपारी इ. फळपिकांची लागवड करण्यासाठी योग्य असल्याचे दिसून आलेले आहे. तथापि, सदरची जमीन भातपिकासाठी अयोग्य असल्याचे जिल्हा मृदा चाचणी अधिकारी यांच्या अहवालात नमुद असल्याने संबंधित कंपनीने भूधारक श्री. अनंत गावंड यांना रु.२५,०००/- इतकी नुकसान भरपाई अदा केली आहे.

मौ. खोपटा येथील अन्य शेतकऱ्यांचे कंपनीच्या दुषित पाण्यामुळे नुकसान झाल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या नसल्याने नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

चंद्रपूर जिल्हयात औद्योगिक ठिकाणी मोठ्या प्रमाणत उद्योग बंद अवस्थेत असल्याबाबत.

(१६) १०१६६५ (१३-०७-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयात एकुण १३ ठिकाणी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली असून सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणत उद्योग बंद अवस्थेत असल्याचे दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उद्योग बंद होण्याचे कारणे काय आहेत,

(३) तसेच चंद्रपूर जिल्हयातील बंद उद्योग पुन्हा सुरू करण्यासाठी उद्योजकांना विशेष योजना

राबवून उद्योग पुन्हा सुरू करण्याचे शासनाच्या विचाराधिन आहे काय,
(४) असल्यास, सदर योजना राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (१९-१२-२०१८) : (१) अंशत: खरे आहे.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण १३ ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना झाली आहे. सदर क्षेत्रात ७३४ भूखंड वाटप केलेले असून २३२ भूखंड उत्पादनात आहेत. तसेच १०२ भूखंडावरील उद्योग उत्पादन सुरू झाल्यानंतर बंद आहेत.
(२) सदर उद्योग बंद असण्याची सर्व साधारण कारणे- प्रदुषण विभागाचे निर्बंध, बाजारपेठेतील चढ-उतार, स्थानिक उत्पादनाचे तुलनेत बाहेरुन येणाऱ्या वस्तुची उच्च गुणवत्ता तसेच नवीन तंत्रज्ञानाचा अभाव असे आहेत.
(३) राज्यातील बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी विशेष अभय योजना राबविण्यात येत होती. तथापि सद्यस्थितीत सदर योजनेचा कालावधी संपुष्टात आलेला आहे. नवीन आद्योगिक धोरणात याबाबत प्रस्ताव विचाराधिन आहे.
(४) राज्यातील बंद उद्योगांना उर्जितावस्थेत आणण्यासाठी शासनाकडून वेळोवेळी उपाययोजना करण्यात येतात. महाराष्ट्र औद्योगिक धोरण २०१३ नुसार पुनरूज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होण्यासाठी आणि बंद उद्योग पुन्हा सुरू होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. २/५/२०१३ अन्वये विशेष अभय योजना जाहिर केली होती. सदर योजनेंतर्गत जे उद्योग घटक विहित कार्यपध्दतीत योग्य ते निकष पूर्ण करतील अशा उद्योग घटकांना विशेष अभय योजनेद्वारे सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर योजनेमध्ये पात्र ठरणाऱ्या घटकांनी राज्य शासनाची सर्व मुद्दलाची रक्कम एकरकमी भरल्यास व्याज व दंडव्याज माफ करण्याची तरतुद होती. सदर योजनेस शासन निर्णय दि. ६/५/२०१६ अन्वये दिनांक ३१/३/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.
(५) प्रश्न उद्भवत नाही

मध्यवर्ती सहकारी बँकेत (जि.चंद्रपूर) येथे नोकर भरतीत झालेला गैरव्यवहार

(१७) १०१६७० (१३-०७-२०१८). ॲड.संजय धोटे (राजूरा) : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हातील मध्यवर्ती सहकारी बँकेत सन २०१३ मध्ये झालेल्या नोकर भरतीत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे आढळुन आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देशमुख (३१-०१-२०१९) : (१) होय.

(२) व (३) होय, बँकेच्या नोकरभरतीबाबत विभागीय सहनिबंधक कार्यालयास प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी प्रशासकीय स्वरुपाची चौकशी करून त्यांच्या अभिप्रायासह चौकशी अहवाल विभागीय सहनिबंधक कार्यालयास सादर केला आहे.

सन २०१३ च्या नोकरभरतीबाबत प्राप्त तक्रारीमध्ये तथ्यांश आढळून येत नसल्याचे अहवालात नमुद करण्यात आले आहे. तद्नंतर सदर नोकरभरती प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंध विभागास प्राप्त स्वतंत्र तक्रारीच्या अनुषंगाने त्यांनी भारतीय दंड संहिता व भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत कारवाई व तपास करुन संबंधीतांवर गुन्हे दाखल केलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

गोकुळ शिरगाव (ता.कागल, जि.कोल्हापूर) येथील अनियंत्रित विजेमुळे औद्योगिक वसाहतीमध्ये निर्माण झालेल्या समस्या

(१८) १०१८०८ (०३-०१-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोकूळ शिरगाव (ता.कागल, जि.कोल्हापूर) औद्योगिक वसाहतीच्या विस्तारीकरणासाठी पाच मेगावॅट विजेची गरज असून शासन पातळीवरुन कोटा मंजूर असताना स्थानिक शासकीय अधिकारी व औद्योगिक विकास महामंडळ यांच्या उदासिनतेमुळे तीन वर्षापासून वीजच मिळाली नसून, उपलब्ध करुन देण्यात आलेल्या वीजेचा पुरवठाही अनियमित व वारंवार खंडित होणारा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महिन्याकाठी गोकूळ शिरगाव वसाहतीमधील उद्योगधंद्यांना रु.२५० कोटीचा फटका बसत असल्याची बाब गोकूळ शिरगांव मॅन्यूफॅक्चरच असोसिएशनच्या वतीने उद्योगांच्या समस्या संदर्भात दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास आयोजित केलेल्या वार्ताहार परिषदेत सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीन, पाणी आणि वीजेच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत तर उद्योग भवनच्या दारात उग्र आंदोलन करण्याचा इशारा उद्योजकांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने गोकुळ शिरगाव वसाहतीतील उद्योजकांच्या समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीमधील मागणीप्रमाणे उच्चदाब जोडण्या देण्याकरिता ३३/११ के.व्ही.गोकुळ शिरगांव उपकेंद्राची क्षमता १० एमव्हीएने वाढविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीसाठी २x५० एम.व्ही.ए. क्षमतेच्या ११०/३३ के.व्ही.गोकुळ शिरगांव उच्चदाब उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जातो. या उपकेंद्रामध्ये ५० एम.व्ही.ए. चे अतिरिक्त रोहित्र महापारेषण कंपनीकडून मंजूर असून त्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

दिनांक ११.१०.२०१७ रोजी गोकुळ शिरगांव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशच्या पदाधिकाऱ्यांच्या सोबत मुख्य अभियंता, कोल्हापूर यांनी गोकुळ शिरगांव औद्योगिक वसाहतीमधील विजेच्या समस्याबाबत आढावा बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीतील चर्चेदरम्यान कुठलाही आंदोलनाचा इशारा उद्योजकांनी दिला नाही. गोकुळ शिरगांव उपकेंद्राची क्षमता वाढविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्याचप्रमाणे दुरुस्ती व देखभालीची कामे जसे एकूण ४० खराब झालेले डिस्ट्रीब्युशन बॉक्सेस दुरुस्त करणे, झाडांच्या फांद्या छाटणे, केबल, डी.ओ.फ्युज, ए.बी.स्वीचेस यांची दुरुस्ती, ५७ ए.बी. स्वीच बसविणे इत्यादी कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

शिनोळी व बेळेभाट (ता.चंदगड, जि.कोल्हापूर) येथील वीज पुरवठा खंडीत होत असल्याने गावकऱ्यांची होत असलेली गैरसोय

(१९) १०७१५५ (०४-०४-२०१८). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिनोळी व बेळेभाट (ता. चंदगड, जि.कोल्हापूर) येथील फिडरवरील गावठाण व शेती या वापरासाठी तर घरगुती वापरासाठी असलेल्या वीजवाहिन्या एकत्र असल्याने लोडशेडिंग तसेच वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने गावकऱ्यांची गैरसोय होत असून शेतीपंप व घरगुती वापरासाठी स्वतंत्र जोडण्या करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दि. ३०/१०/२०१७ रोजी मा.उर्जा मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सततच्या खंडीत वीज पुरवठयामुळे शेतकऱ्यांचे कृषीपंप नादुरुस्त होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार दोन स्वतंत्र जोडण्या करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) चंदगड तालुक्यातील शिनोळी भागातील ११ के.व्ही. बैजनाथ मिश्र वाहिनी व बेळेभाट भागातील ११ के.व्ही बेळेभाट मिश्र वाहिनीचे विभाजन करुन, ११ के.व्ही. बेळेभाट गावठाण व ११ के.व्ही बेळेभाट शेती आणि ११ के.व्ही. वैजनाथ गांवठाण व ११ के.व्ही. वैजनाथ शेती अशा स्वतंत्र वीज वाहिन्या करण्याचे काम महावितरण कंपनीच्या प्रस्तावित "वाहिनी विलगीकरण" योजनेमध्ये समाविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, बुलढाणा अंतर्गत येणा-या अनुदानित आश्रम शाळांना अनुदान मिळत नसल्याबाबत

(२०) ११५७४४ (०४-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, बुलढाणा अंतर्गत येणा-या ३५ अनुदानित आश्रमशाळांना विविध योजनांमधुन मिळणारे अनुदान आदिवासी विकास विभागाकडून गत २ वर्षांपासून मिळालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अनुदान न देण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त अनुदान त्वरीत देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०१-०२-२०१९) : (१) हे खरे नाही.

आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, बुलढाणा असे कार्यालय नसून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला हे कार्यालय आहे. सदर कार्यालयांतर्गत बुलढाणा जिल्हयाचा समावेश आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयांतर्गत एकूण १९ अनुदानित आश्रमशाळा असून त्यापैकी ९ अनुदानित आश्रमशाळा बुलढाणा जिल्हयात आहेत. सदर १९ अनुदानित आश्रमशाळांपैकी १८ आश्रमशाळांचे सन २०१७-१८ मधील सर्व अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२) एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयांतर्गत एकूण १९ अनुदानित आश्रमशाळांपैकी अनुदानित आश्रमशाळा हनवतखेड या बुलढाणा जिल्ह्यातील आश्रमशाळेने अनुदान निर्धारणाकरीता शाळा/वसतिगृहाचे अभिलेखे तपासणी करीता सादर न केल्यामुळे अनुदान निर्धारण करता आलेले नाही. त्यामुळे सदर शाळेचे सन २०१७-१८ चे चौथ्या हप्त्याचे अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही.

(३) अनुदानित आश्रमशाळा हनवतखेड या आश्रमशाळेने अनुदान निर्धारणाकरीता शाळा/वसतिगृहाचे अभिलेखे तपासणी करीता सादर केल्यानंतर अनुदान निर्धारण करुन उर्वरित चौथ्या हप्त्याचे अनुदान वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कुंभार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी स्थापन केलेल्या " संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला " बोर्डाबाबत

(२१) ११८२३२ (२३-०७-२०१८) श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने कुंभार समाजाच्या आर्थिक उन्नतीसाठी "संत शिरोमणी गोरोबा काका मातीकला" बोर्डाची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या बोर्डाअंतर्गत कोणकोणती कामे हाती घेण्यात आली आहेत वा येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुभाष देसाई (३०-०१-२०१९) : (१), (२) व (३)

मंत्री वित्त व नियोजन यांनी सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात मातीकला कारागीरांचा विकास व रोजगार निर्मितीसाठी संत गोरोबाकाका महाराष्ट्र मातीकला बोर्ड वर्धा येथे स्थापन करणार अशी योजना घोषित केली आहे व यासाठी रूपये १० कोटी इतक्या निधीची तरतूद केली आहे.

मातीकला कारागिरांचा विकास व रोजगार निर्मितीसाठी संत गोरोबाकाका मातीकला बोर्ड स्थापन करणे या योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिनांक ०७ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय समिती गठीत करण्यात आली असून या समितीचे पदसिध्द अध्यक्ष, अध्यक्ष महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आहेत व सदस्य सचिव मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आहेत.

या अनुषंगाने समितीची कार्यकक्षा, कारागीरांकडून/संस्थांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या निवडी बाबतचे निकष, निवडण्यात आलेल्या कारागीरांना अनुदान वाटपाबाबतचे निकष या बाबी व इतर अनुषंगीक मुद्दयांवर आधारित संत गोरोबाकाका मातीकला बोर्ड स्थापनेबाबत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ यांचा परिपूर्ण अहवाल अप्राप्त आहे.सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर संत गोरोबाकाका मातीकला बोर्ड स्थापनेबाबतची कार्यवाही सत्वर पूर्ण करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

चाळीस टपरी (भिंगारा) (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) या दुर्गम आदिवासी भागात निर्माण झालेली पाणी टंचाई

(२२) १२०११७ (२६-०७-२०१८) श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाळीस टपरी (भिंगारा) (ता.जळगांव जामोद, जि.बुलडाणा) या दुर्गम भागातील आदिवासी गावात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अदयाप वीज, रस्ते इ.सुविधा नसून पिण्याचा पाण्याची टंचाई निर्माण झाल्याचे दि.१५.५.२०१८ रोजी वा त्या सुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या गावातील आदिवासींना वीज, रस्ते , पाणी इ.सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१७-०१-२०१९) : (१) खरे आहे.

(२) व (३) जळगाव जामोद ता.(जि.बुलढाणा) चाळीस टपरी (भिंगारा) दुर्गम भागातील या आदिवासी गावामध्ये वनविभागाची परवानगी नसल्याने महावितरण ला पांरपारीक पध्दतीने विदयुतीकरण करता आले नाही/येत नाही. परंतु सदर गाव/वस्ती मध्ये महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) मार्फत अपारंपारिक पध्दतीने सौर पथदिव्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. चाळीस टपरी हे गाव पूर्णपणे डोंगराळ भागात असून, सदर गावाला जोडणारा रस्ता रस्ते विकास आराखडा सन २००१-२०२१ नुसार भिंगारा ते चाळीस टपरी ग्रा.मा.०१ एकूण लांबी ४.०० कि.मी. आहे. सदर रस्ता डोंगराळ भागातून जात असून पूर्ण रस्ता वन क्षेत्रामध्ये आहे. सदर रस्ता बांधकामासाठी वन विभागाची परवानगी आवश्यक आहे. त्याबाबत जिल्हा परिषदेकडून वन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला असून परवानगी अप्राप्त आहे. सदर वस्ती करिता पाणी पुरवण्याची विकास कामे करण्याकरिता पंचायत समिती जळगांव जामोद यांनी दि.१४/२/२०१८ रोजी उप वनसंरक्षक बुलढाणा यांचेकडून तात्पुरती नाहरकत मिळणे बाबत विनंती केली आहे. अदयाप परवानगी अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वस्तीगृह बांधणेबाबत

(२३) १२०६६७ (२६-०७-२०१८). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरामध्ये आदिवासी विदयार्थ्यांसाठी पाथर्डी फाटा येथील शासनाच्या भुखंडावर वसतीगृह बांधण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २३/१०/२०१७ रोजीच्या निवेदनानुसार शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२०-११-२०१८) : (१) होय.
(२) नाशिक शहरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नाशिक मनपा हद्यीतील पाथर्डी फाटा येथील भुखंड ३१५/१ ड या जागेसंदर्भात सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, नाशिक यांनी पाहणी केली असून, सदर जागेच्या परिसरात सुमारे १० ते १२ कि.मी. अंतरावर एकही शाळा महाविद्यालय नाही, सदर जागा मध्यवर्ती बस स्थानकापासून १० ते १२ कि.मी. दूर असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांसाठी येण्याजाण्याच्या दृष्टीने गैरसोयीची आहे, तसेच आदिवासी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व आरोग्याच्या दृष्टीने सदरील ठिकाण योग्य नसल्याचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी , नाशिक यांनी अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुषंगाने शहरालगत इतर जागा मिळविण्याचा प्रयत्न सुरु आहे.
(३) प्रश्न उदभवत नाही.

पालघर जिल्हयातील आदिवासी पाड्यांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

(२४) १२०९८६ (२६-०७-२०१८). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील आदिवासी पाड्यांमध्ये मुलभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे तेथील रहिवाश्यांना दैनंदिन जीवनात अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ह्या आदिवासी पाड्यांमध्ये काही वर्षांपूर्वी जलजोडणी करण्यात आली असून सदर जलजोडणीद्वारे अद्यापपर्यंत पाणीपुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या सर्व आदिवासी पाड्यांमधील रस्त्यांची तसेच आरोग्य यंत्रणेची दुरवस्था झाली असून आदिवासी पाड्यांमधील रहिवाश्यांना मुलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (२४-०१-२०१९) : (१) व (२) खरे नाही.
(३) पालघर जिल्हयात राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रमा अंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मंजूर १९ कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०१८-१९ मध्ये एकूण १०४ योजना प्रस्तावित आहेत. दुहेरी पंप सौर योजनेंतर्गत १४ ल.न.पा.पु योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरू करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत १८ योजना प्रस्तावित असून त्यापैकी १५ कामांना तांत्रिक मान्यता प्राप्त झाली आहे. त्यापैकी ९ कामे सुरू करण्यात आली आहेत. ३ कामे कार्यादेश स्तरावर व २ कामे फेरनिविदा तसेच १ काम निवीदा मंजूरी स्तरावर आहेत. २ कामे तांत्रिक मंजूरीसाठी आहेत. १ काम तांत्रिक कारणास्तव रद्द करण्याचे प्रस्तावीत आहे.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत एकूण ६२९ योजना प्रस्तावित असुन त्यापैकी २४८ कामे पुर्ण झाली आहेत व २०० कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच उर्वरीत ५४ कामांची निवीदा प्रक्रीया सुरू आहे. १२७ कामांची पुढील प्रक्रीया सुरू आहे.

मानव विकास कार्यक्रमांतर्गत १६ सौर उर्जेवर आधारीत ल.न.पा.पु योजनांद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्रमांतर्गत पाणी पुरवठ्याची ५५ कामे मंजूर असून त्यापैकी ३३ कामे पुर्ण झाली असून १० कामे प्रगतीपथावर आहेत व उर्वरीत १२ कामांची निवीदा प्रक्रीया सुरू आहे.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत १६९ कामे मंजूर असून त्यापैकी ५९ कामे पुर्ण झाली आहेत. ७७ कामे प्रगतीमथावर आहेत व २३ कामे कार्यादेश स्तरावर असून उर्वरीत १० कामांची निवीदा प्रक्रीया सुरू आहे. तसेच ३०५ विंधन विहीरी खोदण्यात आल्या असून यशस्वी २५० विंधन विहीरींवरती हातपंप उभारणी करण्यात आली आहे.

शासन निर्णय दि.२०.०५.१६ अन्वये जिल्हा शल्य चिकीत्सक, कार्यालय पालघर व अनुषंगिक पदे मंजुर करण्यात आली आहेत. जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालय तात्पुरत्या स्वरूपात ग्रामिण रूग्णालय, पालघर यांचे आवारात सुरू करण्यात आले आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, पालघर यांचे अधिपत्याखाली ३ उपजिल्हा रूग्णालये तसेच ९ ग्रामिण रूग्णालये कार्यरत आहेत.

आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, पालघर अंतर्गत आदिवासी क्षेत्रात ३६ प्राथमिक आरोग्य केंद्र व २६ उपकेंद्र कार्यरत आहेत.

पालघर जिल्हयामध्ये एकूण ३५७७ पाडे/वाडया असून त्यापैकी ३५४५ पाडे/वाडया रस्त्याने जोडलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

मुंबई शहर व उपनगरातील वीज ग्राहकांना समान दराने वीजदर आकारण्याबाबत

(२५) १२६७६० (०६-१२-२०१८). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील विजेचे दर समान करण्याची दोन वर्षापूर्वी मा. मंत्री महोदयांनी घोषणा करूनही अद्याप याबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब नुकतेच शहरात वीज पुरवठा करणाऱ्या चार कंपन्यांनी दि. १७.०९.२०१८ रोजी व त्या सुमारास

जाहीर केलेल्या वीज दरवाढीवरून निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील बेस्ट, अदानी, टाटा आणि महावितरण मिळून ५० लाख वीज ग्राहकांना शासनाने आश्वासन देऊनही अद्याप समान दराने वीज दर शुल्क न आकारण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, समान दराने वीज दर आकारणीबाबत अद्याप शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहे तसेच किती कालावधीत याबाबत निर्णय शासनाकडून होणे अपेक्षित आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०१-२०१९) : (१) व (२) सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या कालावधीकरीता महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे वीज वितरण कंपन्यांचे बहुवार्षिक वीज दर निश्चित केले असून त्यात ० ते १०० युनिट वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांचा दर बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रम वगळता महावितरण, टाटा पॉवर व अदानी इलेक्ट्रिसिटी यांचा वीज दर जवळपास सारखाच असल्याचे आढळत आहे. मुंबईतील एकूण ग्राहक संख्येपेक्षा जास्तीत जास्त ग्राहकांना सदर तीन कंपन्या वीज पुरवठा करतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

परराज्यांना वीज विकण्याच्या महाजेनकोच्या निर्णयाबाबत

(२६) १२७२५३ (०६-१२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परराज्यांना वीज विकण्याची परवानगी महाजनकोने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे मागितली असल्याचे दि. २९ जून, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील विजेची मागणी जास्त मात्र उत्पादन क्षमता कमी आहे व खासगी क्षेत्रातील वीज महाजनकोच्या विजेपेक्षा स्वस्त पडते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणने खासगी क्षेत्रातील वीज निर्मिती कंपन्यांकडून ठराविक वीज खरेदी न केल्यास दंड भरावा लागत असल्याने महाजनकोऐवजी खासगी कंपन्यांची वीज खरेदी करताना त्यांना झुकते माप दिले जाते, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यात विज खरेदी व वितरणाबाबत द्यावयाचा प्राधान्यक्रम आणि महाजेनकोला अन्य राज्यांत वीज विकण्याची परवानगी याबाबत महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उदभवत नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्य वीज नियामक आयोगाने सुनावणीचे ध्वनीचित्रमुद्रण करु नये असा ठराव केल्याबाबत

(२७) १२७६७४ (०४-१२-२०१८). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य वीज नियामक आयोग सन १९९९ मध्ये स्थापन झाल्यापासून सुनावणीच्या कामकाजाचे ध्वनीचित्रमुद्रण करण्यात येते परंतू आता राज्य वीज नियामक आयोगाने यापुढे सुनावणीच्या कामकाजाचे ध्वनीचित्रमुद्रण केले जाणार नाही तसेच उपलब्ध असलेल्या ध्वनीचित्रफिती कोणालाही दिल्या जाणार नाहीत व टप्प्याटप्प्याने नष्ट केल्या जातील असा ठराव माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, आयोगाच्या या ठरावाला वीज ग्राहकांनी विरोध केला असून हा ठराव मागे घ्यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) विद्युत अधिनियम, २००३ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या कार्यवाहीचे ध्वनिमुद्रण किंवा ध्वनीचित्रफीतीचे अभिलेखे ठेवण्याची कोणतीही तरतूद नाही. शिवाय, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्येही आयोगाच्या कार्यवाहीचे ध्वनिमुद्रण किंवा ध्वनीचित्रफीतीचे अभिलेखे ठेवण्याचे कोणतेही विनियम नाहीत.

आयोगाच्या स्थापनेनंतर, आयोगाचे कामकाज पार पाडण्याइतकी कर्मचाऱ्यांची पुरेशी संख्या नव्हती. लघुलेखकांच्या कमतरतेमुळे, आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांच्याकडून तांत्रिक कर्मचारी आदेशांचे श्रुतलेखन (डिक्टेशन) घेत होते. कर्मचाऱ्यांच्या या अपुऱ्या संख्येमुळे आयोगासमोरील सुनावण्याचे ध्वनीमुद्रण करण्याची पध्दत सुरु झाली. परंतु सद्यस्थितीत आयोगाने पुरेशा कर्मचाऱ्यांची नेमणुक केली असून आयोगाचे कामकाज सुरळीत सुरु आहे. त्यामुळे सुनावणीचे कामकाज ध्वनीमुद्रीत न करण्याचा निर्णय आयोगाने घेतला आहे.

(३) यासंदर्भात मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या नियमांमध्ये वारंवार बदल होत असल्याबाबत

(२८) १२७७४१ (०७-१२-२०१८) श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बसवराज पाटील (औसा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: सोलापूर जिल्हयामध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शासनाकडून शिष्यवृत्ती देण्यात येते परंतु शासन नियमांमध्ये वारंवार बदल करीत असल्याने व महाडीबीटी मधील तांत्रिक बिघाडाने शासनाकडून सदर रक्कम संबंधित विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नसल्यामुळे परिणामी व्यवसायिक अभ्यासक्रमांला प्रवेश देताना महाविद्यालय विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काची मागणी करत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१७-२०१८ या शैक्षणिक वर्षामध्ये शासनाने शिष्यवृत्तीसह शिक्षण शुल्क, परीक्षा फी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय घेतला परंतु तांत्रिक कारणांमुळे त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जावू नये व त्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळावी याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१८) : (१) हे खरे नाही.

महाडीबीटीवर आलेल्या तांत्रीक अडचणी तात्काळ सोडविण्यात आल्या असून त्या करीता प्रत्येक प्रकल्प कार्यालयात माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून तांत्रिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामधील सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील ४७८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अदा करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उदभवत नाही.

(४) महाडीबीटी पोर्टलवर असणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता आदिवासी विकास विभागाची ई विकास ऑनलाईन संगणकीय प्रणालीवर अर्ज भरुन घेण्यात आले.

माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आले असून सन २०१८-१९ या वर्षापासून योजनांची अमंलबजावणी करण्यास माहे सप्टेंबर २०१८ पासून सुरवात करण्यात आली आहे.

तसेच क्षेत्रिय कार्यालयामधील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना महाडीबीटी कडून प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. महाडीबीटी पोर्टल अंतर्गत विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांद्वारे वितरीत होणारी रक्कम एकाच केंद्रिय बँक खात्यामधून पात्र विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये डीबीटी द्वारे जमा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

अनुदानित आश्रमशाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करण्याबाबत

(२९) १२८८६० (०७-१२-२०१८) श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची वेळ सकाळी ११ ते ५ करणे, शासकीय आश्रमशाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरु करणे या बाबी शासनाच्या विचाराधीन असल्याचे दि. २४ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आश्रमशाळेतील शिक्षण विभाग व वसतिगृह विभाग स्वतंत्र करण्याबाबतही शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अद्याप शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०१-२०१९) : (१), (२) व (३) आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या मृत्युंच्या कारणांचा अभ्यास करण्यासाठी स्थापन केलेल्या डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशी नुसार आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांचे संध्याकाळचे जेवण व सकाळचा अल्पोपहार यातील अंतर कमी करण्यासाठी शासकीय व अनुदानीत आश्रम शाळांची वेळ निश्चित करण्यात आली आहे

राज्यातील एकलव्य निवासी शाळांमध्ये इयत्ता १ली ते ६वी चे इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरु करण्याबाबत व राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या आय.एस.ओ. (ISO) दर्जा प्राप्त व परिपूर्ण सोयी सुविधा उपलब्ध असलेल्या शाळा तसेच कराडी पथ प्रकल्प चालू असणा-या शासकीय आश्रमशाळांमध्ये इंग्रजी माध्यमाच्या इयत्ता १ली चे वर्ग सुरु करण्यात येऊन वर्गवाढीनुसार प्रत्येक वर्षी पुढील वर्ग सुरु करण्याबाबत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्हयात असलेल्या आदिवासी आश्रम शाळांपैकी एकाही शाळेत क्रीडा शिक्षकाची नेमणूक झालेली नसल्याबाबत

(३०) १२९२०७ (०५-१२-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी आश्रमशाळेत क्रीडा शिक्षक नेमण्याचे धोरण माहे मार्च, २०१८ पासून आखले आहे व त्यानुसार रायगड जिल्हयात चालू शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीसच ही पदभरती करण्यात येणार होती मात्र अद्याप रायगड जिल्हयातील एकाही आदिवासी आश्रमशाळेत क्रीडा शिक्षकाची नेमणूक करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदिवासी शाळांमध्ये क्रीडा शिक्षक पद रिक्त असल्यामुळे येथील विद्यार्थ्यांना खेळांची शास्त्रोक्त माहिती आदींपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेली कित्येक वर्षे क्रीडा शिक्षकाची भरती राज्यासह रायगड जिल्हयात झालेली नसल्यामुळे ती लवकरात लवकर व्हावी अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल अशा प्रकारचा इशारा सुधागड तालुक्यातील पाली येथील शारीरिक शिक्षक श्री.नितीन ढमके यांनी शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (०१-०२-२०१९) : (१),(२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळांमध्ये क्रिडा/क्रिडा मार्गदर्शकांचे नियमित पद मंजूर नाही. परंतु, आदिवासी विकास विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या क्रिडा गुणांना वाव मिळण्यासाठी त्यांना खेळांचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन प्रत्येक शासकीय आश्रमशाळेत कंत्राटी पध्दतीने एक क्रिडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शकांची नेमणूक करण्याबाबतचा निर्णय आदिवासी विकास विभागाच्या दि.०६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानूसार संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय निवड समिती गठीत करण्यात आली आहे.

उपरोक्त नमूद शासन निर्णयांच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण, जि. रायगड यांच्या अंतर्गत असलेल्या १४ शासकीय आश्रमशाळांमध्ये १४ (१३ पुरूष व १ महिला) कंत्राटी क्रिडा शिक्षक/क्रिडा मार्गदर्शकांची ११ महिन्यांच्या कराराने नेमणूक करण्यास्तव वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून जिल्हाधिकारी, रायगड यांचे अध्यक्षतेखाली दि.१६/१०/२०१८ रोजी मुलाखतीची प्रक्रिया पार पाडून गुणानुक्रमानूसार पात्र १४ ठरलेल्या उमेदवारांना (१३ पुरूष व १ महिला) यांची निवड करून एकूण १४ शासकीय आश्रमशाळेच्या ठिकाणी नेमणूकीचे आदेश दि.२४/१०/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले असून त्यापैकी १३ क्रिडा शिक्षक रूजु झाले आहेत.

रायगड जिल्हयामध्ये विधानपरिषदेची स्थानिक प्राधिकारी मतदार संघ निवडणूक सन २०१८ तसेच भारतीय निवडणूक आयोगाची कोकण पदवीधर मतदार संघातील निवडणूकीची आदर्श आचार संहिता लागू असल्याने क्रिडा शिक्षकांची नियुक्ती करण्यासाठी जिल्हाधिकारी, रायगड/अलिबाग यांनी दि.१६/१०/२०१८ रोजीची तारीख मुलाखतीसाठी दिली होती. त्यामुळे सदर प्रकरणी विलंब झालेला नाही.

तसेच शासकीय आश्रमशाळांतील सद्यस्थितील मंजूर पदांच्या आकृतीबंधानूसार कला शिक्षकांचे पद मंजूर नाही. तथापी क्रिडा शिक्षकांच्या धर्तीवर विद्यार्थ्यांमध्ये कलागुणांना वाव मिळण्यासाठी विशेष प्रकल्प घेण्यात येत आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

उजनी प्रकल्पावरती (जि.सोलापूर) तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी शासनाने नेमलेली समिती

(३१) १२९४०४ (०५-१२-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सोलापूर जिल्हयातील उजनी धरणावर १ हजार मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्प उभा करण्याच्या अभ्यासासाठी माहे जून, २०१८ मध्ये महावितरणचे संचालक (वाणिज्य) श्री.सतिश चव्हाण यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या समितीने पर्यावरण व अन्य विषयांचा अभ्यास करून शासनाला अहवाल सादर केला आहे काय, असल्यास त्यावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर समितीचा अहवाल ऊर्जा विभागास प्राप्त झाला असून त्यातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

मुंबई येथे रिलायन्स एनर्जीमध्ये काम करणारे कर्मचारी संपावर गेल्याबाबत

(३२) १२९८६९ (०६-१२-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथे रिलायन्स एनर्जीमध्ये काम करणारे हजारो कर्मचारी संपावर गेल्याने उपनगरात अनेक ठिकाणी विजेमध्ये बिघाड झाल्याने ग्राहकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्या सुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील शिव पासून चेंबूर मानखुर्द, मुलुंड, भांडूप आणि वांद्रे ते दहिसर पर्यंत रिलायन्स एनर्जीचे लाखो ग्राहक असून कंपनीकडे पुरेसे कर्मचारी उपलब्ध नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,या कर्मचा-यांनी आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी केलेल्या आंदोलनाची दखल कंपनीने न घेतल्यामुळे मुंबई उपनगरात अनेक ठिकाणी विजेच्या समस्या निर्माण झाल्या हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-०१-२०१९) : (१) मुंबई इलेक्ट्रिक संघर्ष समिती रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या कालावधीतील काही जुन्या समस्या संदर्भात दि. २७ ऑगस्ट, २०१८ पासून "असहकार आंदोलन" करीत होते. परंतु आंदोलनाच्या कालावधीत अभियंते, अधिकारी आणि आऊटसोर्स संसाधनाच्या मदतीने अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीने अखंड वीजपुरवठा केला असून कंपनीद्वारे मान्यताप्राप्त युनियन बरोबर बोलणी केल्याने दि. १ सप्टेंबर, २०१८ रोजी आंदोलन मागे घेण्यात आल्याचे संबंधित वीज कंपनीने कळविले आहे.

(२) व (३) अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लिमिटेड कंपनीकडे आवश्यक कौशल्य असलेले पुरेसे मनुष्यबळ संसाधन आहे, जे कंपनीच्या ग्राहकांना अखंड व गुणवत्तापूर्ण वीज पुरवठा करीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

उदासा (जि . नागपूर) या गावातील आश्रमशाळेतील रॅगींग प्रकरणाबाबत

(३३) १२९८९० (०७-१२-२०१८) श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदासा (जि.नागपूर) या गावातील आश्रमशाळेतील मोठया मुलांनी लहान मुलांना मारहाण करुन त्यांचे रॅगींग केल्याचे दिनांक २९ जुलै, २०१८ रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रॅगींगमुळे विद्यार्थी घाबरलेले असून शाळेत येण्याच्या मन:स्थितीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत आदिवासी विभागाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाने संबधित विद्यार्थ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-१२-२०१८) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) अनुदानित आश्रमशाळा उदासा या शाळेतील विद्यार्थी देवांशु क्रिष्णा मसराम या विद्यार्थ्याला शाळेतील मोठ्या मुलांनी त्रास दिल्याबाबत लोकमत वृत्तपत्रामध्ये दिनांक ३०.०७.२०१८ रोजी बातमी प्रकाशित झाली होती.

सदर प्रकरणी सहायक प्रकल्प अधिकारी व कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन संबंधितांचे लेखी म्हणणे घेतले. त्यानुसार सदर विद्यार्थी जेव्हापासून शाळेत दाखल झाला तेव्हापासून त्याला नेहमी घरची आठवण येत होती. त्याची मानसिकता शाळेत शिकण्याची नव्हती, असे दिसून येते. सदर विद्यार्थ्याला शाळेतील कोणत्याही मुलाने मारहाण केलेली नाही. याबाबत सदर विद्यार्थ्याची आई श्रीमती सुचिता मसराम यांनी प्रकल्प कार्यालय, नागपूर येथे समक्ष उपस्थित राहून लेखी म्हणणे दिले असून त्यांच्या मुलाला मोठ्या मुलांनी मारहाण केल्याप्रकरणी कोणताही आक्षेप नोंदविला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

अमरावती जिल्ह्यातील शासकिय आश्रमशाळेतील आदीवासी विद्यार्थ्यांना संगणकाचे प्रशिक्षण मिळत नसल्याबाबत

(३४) १२९९०९ (०७-१२-२०१८) प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त अमरावती जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये संगणकाचे प्रशिक्षण देण्यात येत नसल्याचे दि. २ ऑक्टोंबर, २०१८ रोजी

वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील आदिवासी आश्रमशाळा सुरु होऊन तीन महिन्यांचा कालावधी झाला असून संगणकाचे प्रशिक्षण बंद असून याबाबत विद्यार्थ्यांच्या पालकांनी धारणी येथील प्रकल्प अधिकारी श्री. कार्डीले यांची माहे सप्टेंबर मध्ये भेट घेऊन सदर प्रशिक्षण सुरू करण्याबाबत विनंती केली आहे, हे खरे आहे काय ,

(३) असल्यास , याबाबत अद्यापही कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(४) त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे , तसेच प्रशिक्षणापासून वंचित ठेवण्याऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०१-२०१९) : (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) अमरावती जिल्हयातील शासकीय आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यासाठी सीमॅक आय.टी.प्रा.लि. अमरावती या संस्थेस नियुक्त करण्यात आले होते. परंतु, सदर संस्थेकडून चांगल्या दर्जाचे संगणक संच पुरविण्यात आले नाही, नियमित संगणक वर्ग घेण्यात आले नाही, तसेच विद्यार्थ्यांना वेळापत्रकानुसार संगणक प्रशिक्षण देण्यात आले नाही. म्हणून संगणक प्रशिक्षण तात्पुरत्या स्वरुपात बंद करण्यात आले होते. संगणक शिक्षक नेमुन संगणक प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वीर बाबुराव शेडमाके या आदिवासी क्रांतिकारकाचा सन्मान करण्याबाबत

(३५) १२९९६६ (०६-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वीर बाबुराव शेडमाके हे आदिवासींचे प्रेरणास्त्रोत आणि सन १८५७ च्या उठावातील एक क्रांतिकारक असून आदिवासी विकास विभागाने या क्रांतिकारकांच्या बाबतीत चुकीची माहिती प्रकाशित करुन अवहेलना केल्याचे माहे, सप्टेंबर २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या लेखी हे क्रांतिकारक सन १८५४ ला जन्माला आले, १८५७ च्या उठावात सहभागी झाले आणि १८५८ ला फासावरही चढले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चुकीच्या माहितीमुळे आदिवासी समाजाच्या मनात असंतोष निर्माण झाला असून सदरहू चुकीची माहिती दुरुस्त करुन आदिवासी क्रांतिकारकाचा सन्मान करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (१९-०१-२०१९) : (१), (२) व (३)

सन २०१८ च्या दिनदर्शिकेत वीर बाबुराव शेडमाके यांची जन्मतारीख चुकीची छापण्यात आल्याने अपर आयुक्त, आदिवासी विकास नागपूर यांनी दिनांक १०.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये संबधित प्रकाशकास खुलासा सादर करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस बजावली. त्यानुषंगाने संबधित प्रकाशकाने वीर बाबुराव शेडमाके यांची जन्मतारीख टंकलेखन दोषामुळे अनावधानाने चुकीने छापण्यात आल्याचे नमूद करुन, सदर चुक दुरुस्त करुन सर्व आदिवासी बांधवांची व जनतेची माफी मागणेस्तव त्याबाबतचा जाहिर माफीनामा दिनांक १८.१२.२०१८ रोजीच्या दैनिक सकाळ व दैनिक लोकमत (नागपूर) या वृत्तपत्रात प्रसिध्द केला आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील आदिवासी दोन मुलींचा वसतीगृहात प्रवेश होत नसल्याबाबत

(३६) १२९९७० (०६-१२-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी (जि.यवतमाळ) शहरातील मातोश्री शांताबाई तुकाराम चव्हाण विद्यालयात शिक्षण घेणा-या आदिवासी समाजातील दुर्गा पवणे व शारदा पवणे या दोन मुलींचा वसतीगृहात प्रवेश होत नसल्याची माहिती माहे, सप्टेंबर २०१८ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांगले गुण असतानाही त्यांचा वसतिगृहात नंबर लागत नसल्याने त्यांना शिक्षण सोडण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू दोन्ही मुलीच्या वडिलांनी आत्महत्या केली असून त्यांची आई त्यांचे पालनपोषण करीत असून सदरहू दोन्ही मुलींना तातडीने वसतीगृहात प्रवेश देण्याबाबत शासनाने कोणाती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-०१-२०१९) : (१) व (२) नाही.

(३) कु. दुर्गा शालिक पवने या विद्यार्थीनीस इयत्ता ८ वी च्या अभ्यासक्रमासाठी शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह, आर्णी येथे प्रवेश देण्यात आला आहे.

वसतीगृहात इयत्ता ८ वी पासून पूढील वर्गासाठी गूणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. कु. शारदा शालिक पवने ही इयत्ता ६ वीत शिकत आहे. यामुळे ती वसतीगृह प्रवेशास अपात्र आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

आदिवासी आश्रमशाळेत (ता.हिंगणा, जि.नागपूर) येथे मुलाच्या जन्मतारखेचे खोटे प्रमाणपत्र तयार करून केलेला गैरव्यवहार

(३७) १३००७३ (०७-१२-२०१८). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयातील हिंगणा तालुक्यामधील ग्रामोद्वार विद्या प्रसारक शिक्षण संस्था, उखळी या संस्थेचे सचिव श्री. श्रीकृष्ण मते यांनी आपल्या मुलाच्या जन्मतारखेचे खोटे प्रमाणपत्र तयार करुन आदिवासी आश्रमशाळेत लिपीक पदावर नोकरी मिळवली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बाब उघड झाल्यावर संस्थेचे सचिव श्री. श्रीकृष्ण मते यांच्या मुलावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, त्यांची खोटी नियुक्ती दाखवुन वेतन उचलून शासनाची फसवणुक केल्यामुळे त्यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. विष्णु सवरा (३१-१२-२०१८) : (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी चौकशी केली असून त्यामध्ये तथ्य आढळून आले आहे.

(२) होय.

पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर यांनी दिनांक २६.०६.२०१८ रोजी श्री.श्रीकृष्ण मते यांचा मुलगा श्री.मुकेश मते याच्यावर पोलीस स्टेशन हिंगणा, नागपूर येथे गुन्हा दाखल केला आहे.

(३) सदर आश्रमशाळेतील गैरकारभार निदर्शनास आल्यामुळे अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर यांच्या दिनांक २८.११.२०१८ च्या आदेशान्वये प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कल्याण येथील वसतीगृहात विद्यार्थी नियमबाह्य राहत असल्याबाबत

(३८) १३०३३३ (०६-१२-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण येथील वसतीगृहात जवळपास १८ विद्यार्थी नियमबाह्य राहत असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वसतीगृहातील

बोगस विदयार्थ्यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (३१-०१-२०१९) : (१) होय.

मौजे चिकनघर, ता. कल्याण, जि. ठाणे येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह येथे १६ विद्यार्थी नियमबाहयरित्या राहत असल्याबाबत माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२) अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांनी या प्रकरणी चौकशी करुन सदर वसतीगृहामध्ये अनधिकृतपणे राहण्याऱ्या १६ विद्यार्थ्यांना वसतीगृहामधून काढण्याची कार्यवाही केली आहे.

मौजे चिकनघर ता. कल्याण जि. ठाणे येथील वसतीगृहाची इमारत धोकादायक असल्याने सदर वसतीगृह मौजे कोलीवली, ता. कल्याण (पश्चिम), जि. ठाणे येथील भाडयाच्या इमारतीमध्ये दिनांक १.८.२०१८ पासून स्थलांतरीत करण्यात आले आहे.

सदर वसतीगृहामध्ये सध्या अनधिकृतपणे प्रवेशीत विद्यार्थी राहत नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

हिंगोली व परभणी जिल्हयातील आदिवासी विद्यार्थी नामांकित इंग्रजी शाळेची निश्चिती विभागाने न केल्यामुळे प्रवेशापासून वंचित राहिल्याबाबत

(३९) १३०८५२ (०७-१२-२०१८) श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागाने नामांकित इंग्रजी शाळेची निश्चिती केलेली नसल्यामुळे हिंगोली व परभणी जिल्हयातील सहाशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना इयत्ता पहिलीच्या वर्गाचे प्रवेश घेण्यापासून वंचित रहावे लागले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे आपल्या मुलांचे एक वर्ष शिक्षणापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे हिंगोली व परभणी जिल्हयातील पालकांमधून नाराजी व्यक्त केली जात असून शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) त्यानुसार संबधित अधिकारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली तसेच विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१८) : (१) हे खरे नाही.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीता अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे या योजनेंतर्गत कळमनुरी प्रकल्पा अंतर्गत हिंगोली व परभणी जिल्हयांतर्गत एकूण ४५५ आदिवासी विद्यार्थ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ६८ विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या ३ नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे. उर्वरीत विद्यार्थ्यांना आदिवासी आश्रमशाळा बोथी, जामगव्हाण, गोटेवाडी येथे

इयत्ता १ ली करीता इंग्रजी माध्यमाचे नव्याने वर्ग सुरु करण्यात आले असून तेथे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आलेला आहे.

(२) व (३) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

"मद्य घरपोच सेवा" पुरविण्याच्या शासनाच्या धोरणाबाबत

(४०) १३१५२५ (०७-१२-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "मद्य घरपोच सेवा" पुरविण्याचे धोरण राबविण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१८ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरूप काय आहे;

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी राज्यात केव्हापासून करण्यात येणार आहे;

(४) असल्यास, सदरहू प्रस्तावावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात आल्या आहेत काय;

(५) सदरहू प्रस्तावावर जनतेच्या हरकती व सूचना अद्यापपर्यंत मागविल्या नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०१-२०१९) : (१) नाही, हे खरे नाही. असा कोणताही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यासाठी देण्यात येणाऱ्या रक्कमेमध्ये झालेला गैरव्यवहार

(४१) १३१६०४ (०७-१२-२०१८) श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व वैयक्तिक स्वरुपाच्या वस्तूंसाठी निश्चित केलेली रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येते मात्र विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा केलेली रक्कम विद्यार्थ्यांचे पालक स्वतः काढून पैशांचा गैरवापर करत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,थेट रक्कम जमा करण्याच्या पद्धतीमधे योग्य तो बदल करणे आवश्यक

असल्याची लेखी मागणी खेड,पुणे येथील लोकप्रतिनिधींनी दि.२९/०८/२०१८ रोजी मा. आदिवासी विकास मंत्री व राज्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार थेट रक्कम जमा करण्याच्या पद्धतीचा गैरवापर होऊ नये याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (०४-०१-२०१९) : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या मागणीच्या अनुषंगाने दि. ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्रान्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना पुढील कार्यवाही करण्यासाठी सुचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

येवला (जि.नाशिक) येथील आदिवासी मुलींच्या वसतिगृहात होत असलेला गैरप्रकार.

(४२) १३२३५५ (०७-१२-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) येथील आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील अधिक्षिका येथील मुलींकडून नियमबाह्यरित्या पैसे उकळून त्यातून वसतिगृहासाठी झाडू-फिनेल खरेदी करणे, स्वत:चा मोबाईल रिचार्ज करणे इ. प्रकार करीत असल्याचे दि.५.१०.२०१८ रोजी वा त्यासुमारास आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विरोधात येथील सुमारे ५० विद्यार्थ्यांनी नाशिक येथील कार्यालयावर पायी मोर्चा काढला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन या विद्यार्थीनीचे पैसे परत मिळवून देण्याबाबत व या वसतिगृहातील अधिक्षिकेवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास , विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णु सवरा (२८-१२-२०१८) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) शासकीय आदिवासी मुलीचे वसतिगृह, येवला, जि. नाशिक येथील गृहपाल श्रीमती प्रज्ञा पाटील यांना दिनांक १७.११.२०१८ रोजी निलंबीत केले आहे. सर्व विद्यार्थीनींचे पैसे परत

करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

अंढेरा (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथे दारू बंदी करण्याबाबत

(४३) १३२३६१ (०७-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंढेरा (ता.देऊळगावराजा, जि.बुलढाणा) येथून जवळच असलेल्या बायगाव बु. येथील महिला सरपंच यांच्यासह ग्रामस्थांनी ठाणेदारांना दिनांक २ जुलै, २०१८ रोजी वा त्या सुमारास गावात दारू बंदीचे लेखी निवेदन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार अंढेरा या गावात दारू बंदी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०१-२०१९) : (१) बायगाव बु. येथे राज्य उत्पादन शुल्क विभागाची मद्य विक्रीची कोणतीही अनुज्ञप्ती कार्यरत नाही. तथापि, बायगाव बु. येथील महिला सरपंच यांच्यासह ग्रामस्थांनी बायगाव बु. येथील अवैध दारु विक्री बंद करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन अंढेरा पोलीस ठाणे येथे दि.२.७.२०१८ रोजी दिले होते.

(२) ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार पोलीस विभागाने दि.६.७.२०१८ रोजी बायगाव बु. येथील एका आरोपीस अटक करून त्याचेकडून ५ लिटर हातभट्टी दारू व मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, दि.६.१०.२०१८ रोजी बायगाव बु. येथे एका व्यक्तीवर गुन्हा नोंदवून त्याचेकडून १० लिटर हातभट्टी दारु व मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध दारू विक्रीसंदर्भात अंढेरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने दोन आणि दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चिखली यांनी ४ गुन्हे नोंदविले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलीस विभागामार्फत वेळोवेळी धाडी टाकुन अवैध दारुविक्री करणा-यांवर प्रभावीपणे कारवाई करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

उमरगा व लोहारा (जि. उस्मानाबाद) येथील महावितरणच्या रिक्त पदांबाबत

(४४) १३२८६५ (०६-१२-२०१८). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरगा व लोहारा (जि. उस्मानाबाद) येथील महावितरणच्या कार्यालयांतर्गत एकूण १४ उपकेंद्रे कार्यरत असून या सर्व ठिकाणी मंजूर असलेल्या पदांपैकी जवळपास ५० % पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रिक्त पदांमुळे उमरगा व लोहारा तालुक्यातील वीजपुरवठा करण्यात अडचणी

येत असल्याने उमरगा - लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी सदरची रिक्त पदे तात्काळ भरणेबाबत मा.ऊर्जा मंत्री यांना दि.०१.१०.२०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१९) : (१) होय, हे खरे आहे.

उमरगा व लोहारा (जि.उस्मानाबाद) उपविभागांतर्गत उपकेंद्रांतील प्रधान यंत्रचालक, वरिष्ठ यंत्रचालक व यंत्रचालक या संवर्गाच्या ६० मंजूर पदांपैकी ३० पदे रिक्त आहेत तथापि, या रिक्त पदांपोटी महावितरण कंपनीच्या नियमांनुसार २८ बाह्यस्त्रोत कंत्राटी यंत्रचालकांची नियुक्ती करण्यात आली असून, दोन पदे रिक्त आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) तांत्रिक संवर्गातील यंत्रचालक (वेतनगट ३) मधील रिक्त पदे भरती, बदली व पदोन्नतीने भरण्याची प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे. तथापि, यंत्रचालक (वेतनगट ३) मधील रिक्त पदांवर एकूण २८ बाह्यस्त्रोत कंत्राटी यंत्रचालकांची नियुक्ती महावितरण कंपनीमार्फत करण्यात आली आहे.

देवलापार (ता. रामटेक, जि. नागपूर) येथे कनिष्ठ अभियंता व लाईनमनची नियुक्ती करण्याबाबत

(४५) १३३१८५ (०७-१२-२०१८) श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देवलापार (ता. रामटेक, जि. नागपूर) येथे विद्युत उपकेंद्र असून त्यामध्ये ७२ गावांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपूर्ण ७२ गावांकरिता १ कनिष्ठ अभियंत्याची नियुक्ती करण्यात आली असून तेथे लाईनमनची कमतरता असून विद्युत पुरवठा खंडित झाल्यास ३ दिवसांपर्यंत विद्युत पुरवठा सुरू होत नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याची चोकशी केली आहे काय, त्यानुसार अतिरिक्त कनिष्ठ अभियंता व लाईनमनची नियुक्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणेब काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

धानोरा (ता.चोपडा, जि.जळगावं) येथे नवीन केव्ही उपकेंद्र उभारण्याबाबत

(४६) १३३२८३ (०६-१२-२०१८). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरा (ता.चोपडा, जि.जळगावं) येथे नवीन २२० केव्ही उपकेंद्र उभारण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१६/०४/२०१८ रोजी वा त्यासुमारास मा.उर्जा मंत्री यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धानोरा येथे नवीन २२० के.व्ही.सबस्टेशन उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.

(२) चोपडा तालुक्यात अस्तित्वात असलेल्या १३२ के.व्ही. चोपडा विद्युत उपकेंद्रात क्षमता शिल्लक असल्याकारणाने व उपकेंद्राच्या सक्षमीकरणासाठी आणि वीज दाबात सुधारणा आणण्यासाठी केलेल्या व सुरु असलेल्या उपाययोजनांमुळे सद्यस्थितीत धानोरा येथे नवीन उपकेंद्राची आवश्यकता नाही.

(३) प्रश्न उदभवत नाही.

पायाभूत विदयुत सुविधांच्या उभारणीसाठी महापारेषण कंपनीला दिलेल्या कंत्राटात झालेले नुकसान

(४७) १३३५२८ (०७-१२-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पायाभूत विद्युत सुविधांच्या उभारणीसाठी महापारेषण कंपनीने साडेचार हजार कोटींचे इपीसी कंत्राट दिले होते, हे खरे आहे काय

(२) असल्यास, महापारेषणचे या कंत्राटात नुकसान झाले असून नेमके किती नुकसान झाले आहे,

(३) असल्यास, या नुकसानीची माहिती वीज नियामक आयोगाला देण्यात आली नसून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यानुसार या नुकसानीला जबाबदार कंत्राटदार यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२१-०१-२०१९) : (१) महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीने सन २००९ मध्ये रु. ५६६८ कोटीची कंत्राटात उपकरणे/ साहित्यांचे अभियांत्रिकी व आरेखन (Engineering & Design) यांचा पुरवठा (Procurement) यांचा समावेश आहे. करार जरी रु. ५६६८/- कोटींचा असला तरी प्रत्यक्षात मात्र पाच कंत्राटदारांना मिळून रु. २७७० कोटी किंमतीची कामे महापारेषण कंपनीकडून देण्यात आली होती.
(२) सदर करारांमुळे महापारेषण कंपनीचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.
(३) विहित कालमर्यादेत कामे पूर्ण न केलेल्या कंत्राटदारांकडून कामे काढून घेण्यात आली व सदर कामे त्यांच्या जोखीम व आर्थिक जवाबदारीवर (Risk and Cost) पूर्ण करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उदभवत नाही.

रत्नागिरी जिल्हयात महावितरणाचे अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत

(४८) १३३६६५ (०६-१२-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयात महावितरणचे अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर,२०१८ मध्ये उघडकीस आले असून जिल्हयासाठी १ हजार ६५८ पदे पदे मंजूर असतांना, प्रत्यक्षात १ हजार १७३ पदे भरण्यात आली असून ४८५ पदे अद्याप रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयात वरिष्ठ अभियंत्यांची ०५ ,सहायक अभियंत्यांची २२ ,कनिष्ठ अभियंत्यांची २२२ ,विद्युत सहायक ,तंत्रज्ञाची २३६ पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पदे रिक्त राहण्यामागची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,त्यात काय आढळून आले, तद्नसार उक्त रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-०१-२०१९) : (१) हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
माहे ऑक्टोबर, २०१८ अखेर रत्नागिरी मंडलांतर्गत कार्यकारी अभियंता-०१, अनुदेशक-१, उपकार्यकारी अभियंता-०७, अतिरिक्त कार्यकारी अभियंता-०१, सहायक अभियंता-१४, कनिष्ठ

अभियंता-२१, उपव्यवस्थापक (विवले)-१, तंत्रज्ञ-३०८, वर्ग-३ चे तंत्रज्ञ व यंत्रचालक -८७ आणि अतांत्रिक संवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ ची एकूण ४५ पदे अशी एकूण ४८६ पदे रिक्त होती.

(३) अधिकारी / कर्मचारी यांच्या बदल्या, पदोन्नती व सेवानिवृत्तीमुळे सदरची पदे रिक्त झाली आहेत.

(४) व (५) रत्नागिरी मंडलांतर्गत रिक्त असलेल्या एकूण ४८६ पदांपैकी तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील वर्ग-३ व वर्ग-४ च्या रिक्त पदांच्या जागी एकूण ३६१ पदांकरीता बाह्यस्त्रोत कंत्राटी पध्दतीद्वारे कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच, सरळसेवा भरती प्रक्रियेद्वारे माहे डिसेंबर, २०१८ अखेर एकूण १४ कनिष्ठ अभियंत्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

खेड (जि.पुणे) तालुक्यात एकही ग्रामसुरक्षा दल स्थापन न झाल्याबाबत

(४९) १३४०७२ (०७-१२-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बेकायदेशीर दारू तयार करून त्याची विक्री करणे तसेच दारू पिऊन गावातील शांतता भंग करणाऱ्यांवर व दारु व्यावसायिकांचा वेळीच बंदोबस्त करण्यासाठी प्रत्येक गावात ग्रामरक्षक दल स्थापन करण्याचा आदेश राज्य शासनाच्या गृह विभागाने दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध मद्य वाहतूक व विक्री तसेच सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्यांवर वेळीच कारवाई करण्याबाबत महत्वाच्या अशा ग्रामसुरक्षा दलाच्या स्थापनेबाबत निर्णय होवूनही अद्यापपर्यंत ता.खेड,जि.पुणे येथे एकही ग्रामसुरक्षा दल स्थापन झालेले नसल्याची बाब निदर्शनास आलीआहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामसुरक्षा दल स्थापन करण्याबाबत व यासाठी विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-०१-२०१९) :(१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ च्या कलम १३४(अ) पोटकलम १ मध्ये, ग्रामपंचायतीने ठरावाद्वारे किंवा ग्रामसभेच्या २५ टक्क्यांहून कमी नसतील इतक्या महिला मतदारांनी स्वाक्षरीत केलेल्या अर्जाद्वारे, ग्राम रक्षक दलाची स्थापना करण्याकरिता एक विशेष ग्रामसभा बोलाविण्यासाठी त्या क्षेत्राच्या उपविभागीय दंडाधिकारी यांचेकडे विनंती करणे आवश्यक आहे. तथापि, खेड तालुक्यातील कोणत्याही ग्रामपंचायतीने ग्राम रक्षक दल स्थापनेबाबत असा ठराव अथवा अर्ज सादर केलेला नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य उत्पादन शुल्क विभागातील कार्यकारी निरीक्षक व दुय्यम निरीक्षक पदांच्या सध्याच्या कार्यक्षेत्राची पुर्नरचना चुकीच्या पद्धतीने होत असल्याबाबत

(५०) १३४७६७ (२८-१२-२०१८) श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य उत्पादन शुल्क विभागातील कार्यकारी निरीक्षक व दुय्यम निरीक्षक पदांच्या सध्याच्या कार्यक्षेत्राची पुर्नरचना चुकीच्या पद्धतीने व भौगोलिक दृष्ट्या गैरसोयीचे होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी निरीक्षक व दुय्यम निरीक्षक कारवाईसाठी जात असलेवेळी संबधित कार्यालयातून अपुरा कर्मचारी वर्ग उपलब्ध असणे, वाहन व्यवस्था नसणे व कारवाईचे ठिकाणाचे अंतर लांब असणे यामुळे कार्यक्षमतेवर होत असलेला परिणाम त्यामुळे राज्य शासनाचे आर्थिक नुकसान होत आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या विभागातील कार्यकारी निरीक्षक व दुय्यम निरीक्षक पदाच्या सध्याच्या कार्यक्षेत्राची पुर्नरचना होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०५-०२-२०१९) : (१) (२) व (३) होय. प्रस्तुत प्रकरणी चौकशीबाबतची कार्यवाही प्रक्रीयेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

जितेंद्र भोळे
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.